मुंबई, दिनांक ९ मार्च २०१६

भाजपाच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाचा ऐतिहासिक निर्णय

## ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील १०५३ रब्बी गावात टंचाई जाहीर

## अंदाजे ३०० कोटी रुपयांचा शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त बोजा

**- मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे**

मुंबई, दि.९ मार्च – महाराष्ट्राच्या गेल्या ६० वर्षाच्या इतिहासात भाजपाच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने राज्यातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या अहमदनगर व सोलापूर या दोन जिल्हयातील १,०५३ **रब्बी** गावांमध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केली असून अशा परिस्थितीत लागू असलेल्या सर्व सवलती या गावांना लागू करण्यास शासनाने मंजुरी दिली असल्याची माहिती, मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज विधान भवनात बोलताना दिली.

अहमदनगर जिल्हयात राहता, राहुरी, नगर, शेवगांव, पारनेर, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा या तालुक्यातील एकूण ४०८ गावांत; तर, सोलापूर जिल्हयातील दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, करमाळा, माढा, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला या तालुक्यातील ६४५ गावांत मिळून एकूण १,०५३ गांवात टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करुन तालुक्यातील गावांना सवलती लागू करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

सवलतींमध्ये जमीन महसुलात सुट, कृषी पंपाच्या चालू देयकामध्ये ३३.०५ टक्के इतकी सूट. शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकर्सचा वापर आणि या गावांमध्ये शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न (न) करणे इत्यादींचा समावेश आहे. या निर्णयामुळे राज्य शासनाच्या तिजोरीवर अंदाजे ३०० (तीनशे) कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार असल्याचे खडसे यांनी सांगितले.

## १५,४७४ गावांना दोन अतिरिक्त सवलती लागू

सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या १५,७४७ गावांमध्ये वरील सवलती लागू केल्या होत्या. आता या १५,७४७ गावांमध्ये पुढील दोन अतिरिक्त सवलती लागू करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार या गावांमधील शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती आणि सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठण या दोन सवलती लागू करण्यात येणार आहेत.

******